# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. मंजुषा लोढा

संगीत आनंद संगीत स्वानन्द संगीतात आहे परमानंद
गायन असो अथवा वादन, वा असो अभिजात नर्तन ॥ध्रु॥

संगीत करते रोगनिवारण, महती सांगति ग्रंथ प्राचीन
सुखद मंद वाद्यवादन, आल्हाददायक करी वातावरण
जीवनातील प्रत्येक प्रसंगी, अभिव्यक्तिचे सुन्दर साधन ॥१॥

सानुल्याला निजवताना, आई गाते गीत अंगाई
पहाटे जात्यावर दळतांना, गृहिणी गाते गोड़ ओवी
गुरांना पाणी पाजताना, गुराखी घालि शीळ मंजुळ बाई ॥२॥

खंबिरपणे समस्यांना, सामोरे जाण्याची हिम्मत देई
कारखान्यातील मंद संगीत, उत्पादन लक्षणीय वाढवी
आवडीचे सुंदर संगीत, सत्वर मन:शांती मिळवून देई ॥३॥

स्मरण एकाग्रता वाढवी, रचनात्मकता योग्यताही वाढवी
भाव प्रकट करणे जमवी, तनाव,चिंता,क्रोध शमवी
देह, मन, आत्मा शांतवी, सुजाण, सुदृढ़ नागरिक घड़वी ॥४॥

Anahat Music Therapy